दैनिक
# शुभ प्रभात
SHUBH PRABHAT | एक नव्या युगाचा आरंभ...
विभागीय वृत्तपत्र | www.shubhprabhat.co.in | E-Mail : dainikshubhprabhat@gmail.com




Marathwada : Volume No. 01, Issue No. 326, Marathi Daily Friday, Date - 05 June 2026 Price 2 Rupees, Pages - 4 PRGI Reg. No. - MHMAR/25/A1228
मराठवाडा अवृत्ती | वर्ष १ ले | अंक ३२६ वा | मराठी दैनिक | शुक्रवार दि. ०५ जून २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४ | ABD/544/2025-2027

# भेसळखोरांना प्रशासनाचा दणका

## १,९०३ लिटर संशयित तूप जप्त; जालना जिल्ह्यात खळबळ; अन्न व औषध प्रशासनाने सील केले तूप उत्पादन केंद्र

**अच्युत मोरे**

**दैनिक शुभ प्रभात ने ३० मे २०२६ रोजी बनावट खाद्यपदार्थांची विक्री तसेच ३१ मे २०२६ रोजी जालना जिल्ह्यात भेसळखोरांवर कारवाईची टांगती तलवार या मथळ्याखाली प्रकाशित केलेल्या वृत्तांची अखेर प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. अन्न व औषध प्रशासनाने घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथे धडक कारवाई करत तब्बल १३ लाख रुपयांचे १,९०३ लिटर संशयित भेसळयुक्त तूप जप्त केले असून संबंधित उत्पादन केंद्राला सील ठोकले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील भेसळखोरांचे धाबे दणाणले असून, आणखी काही संशयित ठिकाणांवर अन्न व औषध प्रशासनाची करडी नजर असल्याने येत्या काळात मोठ्या कारवायांची शक्यता व्यक्त केली जात आहे.**





दैनिक शुभ प्रभात वृत्ताची दखल

अन्न व औषध प्रशासन विभागाने जालना जिल्ह्यात मोठी कारवाई करत तीर्थपुरी येथील एका उद्योगावर छापा टाकून तब्बल १३ लाख रुपयांचे भेसळयुक्त तूप जप्त केले आहे. गुरुवार दि. ४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता मिळालेल्या माहितीनुसार या कारवाईमुळे परिसरातील अन्न व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली असून भेसळयुक्त अन्नपदार्थांच्या विरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाला तीर्थपुरी येथील मुंदडा इंडस्ट्रीजमध्ये तुपामध्ये भेसळ केली जात असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार विभागाच्या अधिकाऱ्यांनी अचानक छापा टाकून तपासणी केली. या तपासणीदरम्यान तूप तयार करण्यासाठी खाद्यतेल तसेच विविध प्रकारचे इसेन्स वापरले जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी सुमारे १ हजार ९०३ लिटर संशयित भेसळयुक्त तूप जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या तुपाची अंदाजे किंमत १३ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या तुपाची विक्री बाजारात करण्यात येत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने संबंधित ठिकाणावरील संपूर्ण साठा ताब्यात घेत दुकानाला सील ठोकले आहे. तसेच जप्त करण्यात आलेल्या तुपाचे नमुने पुढील तपासणीसाठी अधिकृत प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भेसळयुक्त तूप आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. अशा प्रकारच्या पदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने नागरिकांना दर्जेदार आणि प्रमाणित अन्नपदार्थांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.







दरम्यान, राज्यभर अन्न व औषध प्रशासनाकडून भेसळविरोधी मोहिम राबविण्यात येत असून विविध जिल्ह्यांमध्ये सातत्याने धाडी टाकून कारवाया केल्या जात आहेत. जालना जिल्ह्यातील ही कारवाई देखील त्याच मोहिमेचा एक भाग असून, भेसळखोरांविरोधात प्रशासनाची कारवाई आगामी काळातही सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

या कारवाईमुळे तीर्थपुरी परिसरात एकच खळबळ उडाली असून प्रयोगशाळेच्या अंतिम अहवालाकडे नागरिकांसह प्रशासनाचे लक्ष लागले आहे.







# दुधना नदीपात्रातील अवैध वाळू उत्खननावर मोठी कारवाई

## ३ जेसीबी, ८ हायवा टिपरसह साडेतीन कोटींचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात अवैध वाळू उत्खननाविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत दुधना नदीपात्रातून सुरू असलेला अवैध गौण खनिज उपसा उधळून लावला. या कारवाईत ३ जेसीबी मशीन, ८ हायवा टिपर आणि १२ ब्रास वाळूसह तब्बल ३ कोटी ४५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ७.४५ वाजता घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रामध्ये काही व्यक्ती जेसीबी मशीन आणि हायवा टिपरच्या साहाय्याने अवैधरित्या वाळू उत्खनन व वाहतूक करीत आहेत.

माहितीची खातरजमा करून तात्काळ कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांनी दोन स्वतंत्र पथके तयार केली. त्यानंतर पोलीस पथकाने भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रात छापा टाकला. यावेळी काही इसम ३ जेसीबी मशीनच्या सहाय्याने ८ हायवा टिपरमध्ये नदीपात्रातून वाळू भरत असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सर्व वाहने आणि चालकांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान चालकांकडे वाळू उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील कोणताही वैध परवाना, पावती अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी आढळून आली नाही. तसेच वाळू उत्खनन व वाहतुकीबाबतचे आवश्यक आदेशही सादर करण्यात आले नाहीत.

यामुळे पोलिसांनी ८ हायवा टिपर, ३ जेसीबी मशीन आणि १२ ब्रास वाळू असा एकूण ३ कोटी ४५ लाख ५५ हजार रुपयांचा (पान २ वर...)

# बसस्थानक परिसरातील दोन लॉजवर पोलिसांचे सलग छापे

## देहविक्री प्रकरणी चौघांवर गुन्हे, तीन महिलांची सुटका

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील बसस्थानक परिसरात सुरू असलेल्या कथित देहविक्री व्यवसायाविरोधात सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पथकाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी धाडसी कारवाया करत चौघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून रोख रक्कम व इतर मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू तसेच अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार विशेष पथके तयार करून ही कारवाई केली.

पहिल्या कारवाईत बसस्थानकाजवळील दुर्गा लॉजवर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान कल्याण अंकुश लोखंडे (रा. पिरपिंपळगाव, ता. जि. जालना) हा



स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरून महिलांना बोलावून त्यांच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्याकडून १ हजार ८०० रुपये रोख रक्कम व सुमारे ५०० रुपयांचा इतर मुद्देमाल असा एकूण २ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी महिलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियमातील कलम ३, ४, ५ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव करीत आहेत.

दुसऱ्या कारवाईत बसस्थानक परिसरातील मोक्ष लॉजवर सदर बाजार पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने, भोकदन नाका चौकी आणि मानव तस्करी प्रतिबंधक पथकाच्या मदतीने संयुक्त छापा टाकला. गोपनीय माहितीनुसार लॉजमध्ये बाहेरून महिलांना बोलावून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

छाप्यात तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. तसेच लॉज मालक सचिन नंदू पवार (रा. संभाजीनगर, जालना), मॅनेजर संतोष भोलेनाथ जाधव (रा. खरपुडी) आणि ग्राहक नितेष कुमार रॉय यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत ३ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध अनैतिक (पान २ वर...)




## थोडक्यात...

### गोंदी पोलिसांची व महसूल विभागाची संयुक्त धडक कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन आणि चोरट्या वाहतुकीविरोधात पोलिस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत ३ हायवा आणि १ ट्रॅक्टर असा एकूण ६४ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार जणांविरुद्ध वाळू चोरीचे तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दि. १ जून २०२६ ते ४ जून २०२६ या कालावधीत गोंदी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुरले, पोलीस कर्मचारी आणि महसूल विभागाच्या पथकाने संयुक्तरीत्या ही कारवाई केली. गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचे उत्खनन करून त्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर छापे टाकून ३ हायवा आणि १ ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६९/२०२६, १७१/२०२६ आणि १७२/२०२६ असे तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२), खाण आणि खनिज (विकास व नियमन) अधिनियमातील कलम ४ व २१ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ४८(७) व ४८(८) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

# लुटमारीच्या गुन्ह्यातील सराईत आरोपी शस्त्रांसह जेरबंद

## सोशल मीडियावर रील्स बनवून दहशत माजविणाऱ्यावर कदीम पोलिसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील कदीम पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोशल मीडियावर धारदार शस्त्रांचे रील्स बनवून समाजात दहशत निर्माण करणाऱ्या आणि लुटमारीच्या गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या सराईत आरोपीस कदीम पोलिसांनी शस्त्रांसह जेरबंद केले आहे. आरोपीकडून दोन तलवारी, एक कोयता आणि एक मोबाईल असा एकूण १४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ३ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.२० वाजण्याच्या सुमारास कदीम पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सोशल मीडियावर धारदार शस्त्रांचे रील्स बनवून दहशत निर्माण करणारा एक इसम नूतन वसाहत, जुना जालना येथील मच्छी मार्केट परिसरात हातात तलवार घेऊन फिरत आहे.

ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने दोन पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. दुपारी सुमारे ३.३० वाजता एक संशयित इसम परिसरात फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने पळण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत त्याला ताब्यात घेतले.



चौकशीदरम्यान त्याने आपले नाव विशाल ऊर्फ रफया संतोष टाकळकर (वय २५, रा. नूतन वसाहत, जुना जालना) असे सांगितले. पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून एक तलवार हस्तगत करण्यात आली. तसेच अंगझडतीमध्ये शर्टाच्या आत पाठीमागील बाजूस लपवून ठेवलेली आणखी एक धारदार तलवार आणि एक कोयता आढळून आला.

पोलिस तपासात आरोपीविरुद्ध कदीम पोलीस ठाण्यात यापूर्वीही लुटमारीसह विविध गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. गुन्हा क्रमांक १६२/२०२५, १४०/२०२६, १४१/२०२६ आणि १५४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हे दाखल असून तो या गुन्ह्यांमध्ये फरार होता.

या कारवाईत आरोपीकडून दोन तलवारी, एक कोयता आणि गुन्ह्यात वापरलेला मोबाईल असा एकूण १४ हजार ५०० (पान २ वर...)

# पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणार्थी तरुणीचा खदानीतील पाण्यात बुडून मृत्यू

## अकॅडमी संचालक व प्रशिक्षकाविरोधात गुन्हा दाखल

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील दहीगव्हाण खुर्द येथील पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या १९ वर्षीय तरुणीचा खदानीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी घडली. या प्रकरणी मृत तरुणीच्या वडिलांनी अकॅडमीचे संचालक आणि प्रशिक्षक यांच्या निष्काळजीपणामुळे मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप करत तक्रार दिल्याने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मृत तरुणीचे नाव प्रिती अंशीराम भाकड (वय १९, रा. दहीगव्हाण खुर्द, ता. अंबड) असे आहे. ती अंबड-पाचोड रोडवरील मत्स्योदरी अकॅडमीमध्ये पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेत होती. प्रशिक्षणासाठी ती अंबड येथील सुरंगे नगर भागात भाड्याच्या खोलीत राहत होती.

मृत प्रितीचे वडील अंशीराम एकनाथ भाकड यांनी अंबड पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबानुसार, ४ जून रोजी सकाळी त्यांच्या मुलगा अजय याला फोनद्वारे प्रितीबाबत माहिती मिळाली. त्यानंतर अजय अंबड येथील शासकीय रुग्णालयात पोहोचला असता प्रितीचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर कुटुंबीयांनी रुग्णालयात धाव घेतली.

कुटुंबीयांनी केलेल्या चौकशीत प्रितीसोबत राहणाऱ्या संध्या लोखंडे हिने सांगितल्याप्रमाणे, अकॅडमीचे संचालक गोकुळ बारवाल आणि प्रशिक्षक गणेश भागवत वायसे यांनी प्रशिक्षणार्थींना वलखेडा शिवारातील खदानी परिसरात नेले होते. तेथे विद्यार्थ्यांना पाण्यात पोहण्यासाठी उतरविण्यात (पान २ वर...)

## संपादकीय

# भेसळीच्या विळख्यात अन्नसुरक्षा

जालना जिल्ह्यातील तीर्थपुरी येथे अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेली भेसळयुक्त तुपावरील कारवाई ही केवळ एका उद्योगावरील धाड नसून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रवृत्तींना दिलेला कठोर इशारा आहे. तब्बल १ हजार ९०३ लिटर संशयित तूप जप्त होणे आणि त्याची किंमत सुमारे १३ लाख रुपये असणे ही बाब चिंताजनक आहे. यावरून भेसळीचा व्यवसाय किती मोठ्या प्रमाणावर आणि संघटित पद्धतीने चालतो याची कल्पना येते. भारतीय संस्कृतीत तुपाला विशेष महत्त्व आहे. धार्मिक विधींपासून ते दैनंदिन आहारापर्यंत तुपाचा वापर केला जातो. तूप हे आरोग्यदायी आणि पौष्टिक अन्नपदार्थ म्हणून ओळखले जाते. मात्र त्यात खाद्यतेल, कृत्रिम इसेन्स किंवा इतर घटक मिसळून बनावट तूप तयार केले जात असेल, तर तो केवळ आर्थिक फसवणुकीचा विषय राहत नाही, तर तो थेट सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनतो. आज बाजारपेठेत नफेखोरीच्या स्पर्धेत काही व्यापारी आणि उत्पादक ग्राहकांच्या विश्वासाशी खेळत आहेत. कमी खर्चात अधिक नफा कमावण्यासाठी अन्नपदार्थांमध्ये भेसळ केली जाते. ग्राहकाला शुद्ध तूप विकत घेत असल्याचा विश्वास दिला जातो, मात्र प्रत्यक्षात त्याच्या हातात निकृष्ट आणि आरोग्यास घातक पदार्थ दिले जातात. अशा प्रकारच्या भेसळीमुळे पचनसंस्थेचे विकार, हृदयविकार, यकृताचे आजार आणि इतर अनेक आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. अन्न व औषध प्रशासन विभागाने वेळोवेळी अशा धाडसी कारवाया केल्या आहेत. मात्र केवळ कारवाया करून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. कारण भेसळखोरांचे जाळे अनेकदा व्यापक स्वरूपाचे असते. उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री या संपूर्ण साखळीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी भेसळ सिद्ध होईल, तेथे कठोर दंडात्मक कारवाईसोबत परवाने रद्द करणे, आर्थिक दंड आणि फौजदारी गुन्हे दाखल करणे यांसारखे उपाय प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. याचबरोबर ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. स्वस्त दरात मिळणाऱ्या वस्तूंच्या मोहापेक्षा गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. पॅकेजिंग, उत्पादन परवाना, उत्पादकाची माहिती आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे तपासूनच अन्नपदार्थ खरेदी करण्याची सवय नागरिकांनी लावून घेतली पाहिजे. संशयास्पद अन्नपदार्थ आढळल्यास त्याची माहिती तत्काळ संबंधित विभागाला देणे ही देखील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. जालना जिल्ह्यातील ही कारवाई प्रशासनाच्या दक्षतेचे उदाहरण आहे. मात्र प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल आल्यानंतर दोषी आढळणाऱ्यांवर कठोर आणि उदाहरणात्मक कारवाई होणे आवश्यक आहे. कारण अन्नातील भेसळ हा केवळ कायद्याचा भंग नसून तो समाजाच्या आरोग्याविरुद्धचा गुन्हा आहे. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन, उत्पादक, विक्रेते आणि ग्राहक या सर्वांनी एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. भेसळमुक्त अन्न ही केवळ अपेक्षा नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. हा हक्क अबाधित राखण्यासाठी भेसळखोरांविरोधातील लढा अधिक व्यापक, सातत्यपूर्ण आणि कठोर होण्याची काळाची गरज आहे.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.




राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मॅंग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतः ची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल ' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**प्रवीण टाके**



# मेळघाटमध्ये आदिवासी बांधवांना प्रभावी आरोग्य सुविधा पुरविण्यात यावी - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाट भागामध्ये प्रभावी आरोग्य सुविधा पुरविण्याचे निर्देश नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांतील सार्वजनिक आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी आयोजित बैठकीत देण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात ही बैठक पार पडली.

सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत प्रलंबित आरोग्यविषयक प्रकरणावर सकारात्मक चर्चा करण्यात आली.



अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाट भागामध्ये आदिवासी बांधवांना प्रभावी आरोग्य सुविधा पुरविण्यात यावी. याची खबरदारी घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भागास नियमित भेटी देण्याचे निर्देश यावेळी महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले. नागपूर जिल्ह्यातील नरखेड येथील ग्रामीण रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनासाठी आवश्यक बांधकाम निधी उपलब्ध करण्यासह, कामठी येथील उपजिल्हा रुग्णालयास प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रस्तावावर या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली. मौदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची रिकामी जागा नगर परिषदेस हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. बोरखेडी फाटक आणि देवळीगुजर येथील नव्याने बांधलेल्या दोन उपकेंद्रांसाठी प्रत्येकी तीन पदे अशा एकूण सहा पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव, याशिवाय नागपूर येथील नव्या जिल्हा रुग्णालयासाठी १५८ पदे, उमरेड येथे ट्रॉमा केअर युनिटची पदनिर्मिती, तसेच कुही येथील ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामासाठी सुधारित खर्चाच्या प्रस्तावास गती देण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

# कोट्यवधींचा घोटाळा; थिंकटेक कंपनीचा मालक अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजवडीतील कंपनीला रातोरात टाळे ठोकणाऱ्या मालकाला अखेर बेड्या ठोकण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. थिंकटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक हर्षल ठाकरेने ७०० आयटी अभियंत्यांची फसवणूक केली होती. लॅपटॉपचे डिपॉझिट म्हणून घेतलेले १५ हजार आणि जानेवारी पासून पगार थकवत ठाकरे गायब झाला होता. याप्रकरणी हिंजवडी पोलिसांकडे २१ मे ला आयटी अभियंत्यांनी तक्रार दिली होती.

मात्र पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ केली गेली.

हे सर्व प्रकरण माध्यमांनी समोर आणले. तेव्हा आम्ही हर्षल ठाकरेचा शोध घेतोय, असं तकलादू उत्तर पोलिसांनी दिलं. मात्र प्रत्यक्षात ठाकरेचा फोन सुरु होता, पोलीस त्याला अटकेपासून संरक्षण देत असल्याचं माध्यमांनी समोर आणलं. मग तोंडघशी पडलेल्या हिंजवडी पोलिसांना जाग आली. त्यांनी कंपनी सीईओ हर्षल ठाकरे, ट्रेनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट हेड ध्रुवील पारेख



आणि एचआर सौम्या सिंग यांच्यासह कंपनीतील इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र आयटी अभियंते तक्रार द्यायला उशीरा आले, असं फिर्यादीत नमूद केलं.

स्वतःच्या बचावासाठी हिंजवडी पोलिसांनी आधीचं फसवणूक झालेल्या आयटी अभियंत्यांवर यानिमित्ताने पुन्हा दबाव आणल्याचं उघड झालं. शिवाय केवळ ११ लाख २५ हजारांची फसवणूक केल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे. ७०० आयटी अभियंत्यांकडून १५ हजार प्रमाणे घेतलेलं डिपॉझिट आणि जानेवारी पासून थकवलेला पगार हा आकडा कोट्यवधींच्या घरात जाणं अपेक्षित आहे. मात्र पोलिसांकडून गुन्ह्यांची तीव्रता कमी करण्याचा खटाटोप सुरु असल्याचं दिसतंय. आधीचं गुन्हा दाखल करायला उशीर करणारे पोलीस तपासात असा कुचकामीपणा करणार नाहीत ना? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## पान १ वरुन...

**दुधना नदीपात्रातील अवैध...**

मुद्देमाल जप्त करून पुढील कारवाईसाठी घनसावंगी पोलीस ठाण्यात आणला. या प्रकरणी ४ जून रोजी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

दुधना नदीपात्रातील या मोठ्या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली असून जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

**बसस्थानक परिसरातील दोन...**

मानवी व्यापार व वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

या दोन्ही कारवायांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदसिंग साबळे, डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप तसेच त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. मोक्ष लॉजवरील कारवाईत मानव तस्करी प्रतिबंधक पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली.

बसस्थानक परिसरातील अवैध देहविक्री व्यवसायाविरोधात पोलिसांनी सलग कारवाया केल्याने शहरातील अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

**लुटमारीच्या गुन्ह्यातील सराईत...**

रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघुबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव, पोलीस उपनिरीक्षक मच्छिंद्र वाघ तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली.

शहरात धारदार शस्त्रांचे प्रदर्शन करून दहशत निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

**पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षणार्थी...**

आले. मात्र घटनास्थळी कोणत्याही प्रकारचे बचाव साहित्य उपलब्ध नव्हते. याचदरम्यान प्रितीचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.


तक्रारीनुसार, प्रितीला पोहता येत नसल्याची माहिती संबंधितांना असतानाही तिला खदानीतील पाण्यात उतरविण्यात आले. तसेच पोलीस भरती प्रक्रियेमध्ये मुलींसाठी पोहण्याची कोणतीही सक्ती नसताना आणि आवश्यक सुरक्षा व्यवस्था नसताना प्रशिक्षण देण्यात आल्याने हा प्रकार घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घटनेनंतर संबंधितांनी कुटुंबीयांना कोणतीही माहिती दिली नसून संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यावर फोन बंद असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी मत्स्योदरी अकॅडमीचे संचालक गोकुळ बारवाल आणि प्रशिक्षक गणेश भागवत वायसे यांच्याविरोधात निष्काळजीपणा व जबाबदारी निश्चित करून गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी मृत तरुणीचे वडील अंशीराम भाकड यांनी केली आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे दहीगव्हाण खुर्द गावासह अंबड तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रांमधील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

मीडिया करिअरची संधी
न्यूज अँकर आणि व्हॉईस ओव्हर साठी मुलगी हवी आहे




पात्रता आणि निकष
स्पष्ट मराठी शब्दोच्चार : भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक.
आत्मविश्वास : कॅमेरा समोर बोलण्याची उत्तम तयारी.
नवोदितांना प्राधान्य : जर तुमच्याकडे टॅलेंट असेल, तर अनुभवाची अट नाही.
जबाबदारी : बातम्यांचे सादरीकरण करणे. न्यूज बुलेटिन आणि स्टोरीजसाठी व्हॉईस ओव्हर देणे.
अधिक माहितीसाठी संपर्क
9850516724

## थोडक्यात...

### विषारी दारू प्रकरणात आणखी ४ पोलिस निलंबित; एकूण कारवाईचा आकडा २९ वर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह राज्यात खळबळ उडवणाऱ्या विषारी दारू प्रकरणाच्या तपासासंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे. पुणे ग्रामीण पोलीस दलातील आणखी चार पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान, पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील आत्तापर्यंत २९ जणांचे निलंबन करण्यात आले असून विषारी दारू प्रकरणातील मुख्य आरोपी राधेश्याम प्रजापती याच्याशी संपर्कात पोलीस कर्मचारी असल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. परिणामी तपासाअंती आता आणखी चार पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अजित शिवाजी काळे (पोलिस हवालदार, उरुळी कांचन पोलिस ठाणे), सुमीत नंदकुमार वाघ (पोलिस अंमलदार, उरुळी कांचन), रामदास ज्ञानदेव जगताप (पोलिस हवालदार, यवत) आणि सुभाष बलभीम डोईफोडे (पोलिस हवालदार, दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय) अशी निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पुणे, पिंपरी चिंचवड, पुणे ग्रामीण या पोलीस दलासह राज्य उत्पादन शुल्क या ठिकाणच्या अधिकारी कर्मचारी मिळून आत्तापर्यंत २९ जणं निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान, पुणे शहर पोलीस दलातील ३, पिंपरी चिंचवड पोलिसांतील ६, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे १३ तर पुणे ग्रामीण पोलीस दलातील ७ असे एकूण २९ जणांचे निलंबन करण्यात आले आहे. दुसरीकडे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी हातभट्टी दारूमुळे नागरिकांचा मृत्यू झालेल्या प्रकरणाचे पडसाद राज्यभरातही उमटतांना दिसत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यात आता पोलीस प्रशासन धडक कारवाई करत हातभट्टीचे ठिकाणं उध्वस्थ केले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह राज्यात खळबळ उडवणाऱ्या विषारी दारू प्रकरणात आत्तापर्यंत २२ जणांचा बळी घेतला आहे. ही विषारी दारू फुगेवाडीतच बनवली जात होती. दरम्यान, पुण्यातील विषारी दारू प्रकरणात ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली. यावेळी त्यांनी भेट घेवून ज्या पोलिसांना निलंबित केला आहे, त्यांना सह आरोपी करण्याची मागणी केलीय. फक्त निलंबन करू नका, तेवढ्यावर चालणार नाही. त्यांना सहआरोपी करा. त्यांना या सगळ्या धंद्याची माहिती होती, तरीही अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही? असा सवालही त्यांनी केला आहे.

### वडार समाजाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा - मंत्री अतुल सावे

**मुंबई । प्रतिनिधी**

वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळामार्फत वडार समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

राज्यातील वडार समाजाच्या प्रलंबित विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीला आमदार अभिमन्यू पवार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री अतुल सावे म्हणाले की, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वडार समाजासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. समाजातील नागरिकांनी जनजागृती करून विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच राज्यातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या वसतिगृहांमध्ये वंचित घटकांसाठी आरक्षण उपलब्ध असून वडार समाजातील विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

# चारचाकी आणि फ्लॅटसाठी पैशांची मागणी; विवाहितेच्या मृत्यूनंतर सासरच्यांवर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील चंदननगर परिसरातून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. २५ वर्षीय विवाहितीने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आपलं जीवन संपवलं आहे. पतीसह सासरच्यांकडून सातत्याने होणारी पैशांची मागणी, शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून विवाहितेने तिचं आयुष्य संपवलं आहे. या प्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात पतीसह सासू-सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तेजस्विनी गोरख सोनवणे असं जीवन संपवणाऱ्या २५ वर्षीय नवविवाहितेचं नाव आहे.

तिने लग्नानंतर अवघ्या काही दिवसातच आपल्या आयुष्याचा शेवट केला. या घटनेमुळं हळहळ व्यक्त



होत आहे. या घटनेनंतर तेजस्विनीचे नातेवाईक आक्रमक झाले असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. पीडितेच्या वडिलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली आहे.

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, तेजस्विनी हिचे लग्न झाल्यानंतर सासरच्या मंडळींकडून तिच्याकडे वारंवार पैशांची आणि वस्तुंची मागणी केली जात होती. चारचाकी गाडी आणि फ्लॅट खरेदी करण्यासाठी माहेरहून पैसे आण, असं म्हणत सासरच्या लोकांनी तिचा छळ सुरू केला होता. इतकेच नाही तर, माहेरहून सोन्याची अंगठी आणण्यासाठीही तिच्यावर सतत मानसिक आणि शारीरिक दबाव टाकला जात होता.

सासरच्या लोकांकडून होणारा सततचा छळ आणि पैशांची हाव यामुळे तेजस्विनी प्रचंड मानसिक दडपणाखाली होती. अखेर या त्रासाला कंटाळून तिने टोकाचे पाऊल उचलत आपलं जीवन संपवलं. या दुर्दैवी घटनेनंतर पीडित तेजस्विनीच्या वडिलांनी तातडीने पोलिसांत धाव घेतली. वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पुण्यातील चंदननगर पोलीस ठाण्यात मृत विवाहितेचा पती, सासू आणि सासऱ्यांविरोधात हुंडाबळी आणि छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## रक्ताच्या थारोळ्यात आढळला २६ वर्षीय कामगाराचा मृतदेह; राहुरी हादरले

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ परिसरात एका २६ वर्षीय कंत्राटी कामगाराचा अत्यंत क्रूर पद्धतीने खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. २ जूनच्या रात्री राहुरी-शनिशिंगणापूर रोडलगत ही घटना घडली आहे. कापूस सुधार प्रकल्पाशेजारी रक्ताच्या थारोळ्यात युवकाचा मृतदेह आढळून आला.




मिळालेल्या माहितीनुसार, धारदार शस्त्राने तोंड आणि पायावर वार केल्याच्या जखमा मृतदेहावर दिसून आल्या आहेत. कैलास पोपट दोंदे असे मृत युवकाचे नाव असून तो राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा येथील रहिवासी होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला असून, राहुरी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## भीषण अपघात; दुचाकीस्वार दोन मित्रांचा जागीच मृत्यू

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील रस्ते अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. याउलट वेगवेगळ्या कारणास्तव रस्ते अपघाताच्या घटना घडत आहेत. गेल्याच महिन्यात मुरबाडमध्ये एका पिकअप वाहनाचा अपघात होऊन ११ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. आता, पुन्हा एकदा कल्याण-मुरबाड-नगर महामार्गावरील वरपगाव परिसरातून एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. मित्राला भेटण्यासाठी निघालेल्या दोन मित्रांच्या दुचाकीला अपघात होऊन दोघांचाही जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

उल्हासनगरहून पहाटेच्या सुमारास




आपल्या दुचाकीने मित्राला भेटण्यासाठी निघालेल्या दोन तरुणांचा भीषण अपघातात जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. वरप येथील हनुमान मंदिराजवळ एका ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात या दोन्ही तरुणांची दुचाकी थेट ट्रकच्या मागच्या टायरखाली आली. हा अपघात इतका भीषण होता की, त्यामध्ये दोघेही तरुण गंभीर चिरडले गेले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. राजू गुप्ता आणि पवन गुप्ता अशी मृत पावलेल्या दोन्ही तरुणांची नावे असून ते उल्हासनगरचे रहिवासी होते.

अपघाताची माहिती मिळताच टिटवाळा पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात (सेंट्रल हॉस्पिटल) पाठवले आहेत. मित्राला भेटायला जातानाच दोन्ही तरुणांवर काळाने घाला घातल्याने सर्वत्र हळबळ व्यक्त होत आहे. या दुर्दैवी घटनेनंतर उल्हासनगरमधील त्यांच्या निवासस्थानी, परिसरात शोककळा पसरली आहे. ओव्हरटेक करताना झालेल्या या दुर्घटनेप्रकरणी टिटवाळा पोलीस आता पुढील कायदेशीर तपास करत आहेत.

## कामथे उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर रंगेहात पकडल्या; ४५०० रुपयांची लाच घेताना कारवाई

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील कामथे उपजिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. कांचन मदार यांना ४ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची घटना समोर आली आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका महिलेला गर्भपातासाठी लागणाऱ्या गोळ्यांचे किट उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. मदार यांनी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. संबंधित



महिलेने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर अँटी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी अवघ्या काही तासांत सापळा रचला. त्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईत डॉ. कांचन मदार यांना ४ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

डॉ. मदार या रत्नागिरी जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील परिचित नाव मानल्या जातात. त्यामुळे त्यांच्या विरोधात झालेल्या या कारवाईची चर्चा जिल्हाभर सुरू असून वैद्यकीय क्षेत्रातही आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

या प्रकरणी पुढील कायदेशीर कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू असून अधिक तपास करण्यात येत आहे.

## आयुर्वेदिक चिकित्सालयाच्या नावाखाली अलोपथी उपचार; बोगस डॉक्टर फरार

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील येवलामध्ये आरोग्य विभागानं मोठी कारवाई केली आहे. येवल्यात बोगस डॉक्टरवर कारवाई केली आहे. आरोग्य विभागाने घातलेल्या छाप्यामध्ये लेबल नसलेल्या औषधांचा व इंजेक्शन साठा जप्त करण्यात आला आहे. विनापरवानगी वैद्यकीय व्यवसाय सुरू होता. कारवाईनंतर बोगस डॉक्टर नॉट रिचेबल झाला आहे.

नाशिकच्या येवला तालुक्यातील बोकटे येथे गेल्या दहा वर्षांपासून आयुर्वेदिक चिकित्सालयाच्या नावाखाली अलोपथी उपचार करून लेबल नसलेले औषधे रुग्णांना दिली जात असल्याची गुप्त माहिती आरोग्य विभागाला मिळाली होती. त्यानुसार आरोग्य विभागाने घातलेल्या छाप्यामध्ये लेबल नसलेल्या २० ते २५ हजार गोळ्या, सलाईन , व सिरींज जप्त केल्या असून उपचार करत असलेला ' रॉय ' नावाचा




बोगस डॉक्टर कारवाईनंतर नॉट रीचेबल झाला आहे. दरम्यान, आरोग्य विभागाकडून बोगस दवाखाना सील करण्यात आला असून डॉक्टरची डिग्री तपासणीसाठी पाठवण्यात आली असल्याची माहिती प्रभारी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. तारू आनंद यांनी दिली आहे. कारवाई झाल्यानंतर डॉक्टर रॉय हा नॉट रिचेबल झाला असून गेल्या दहा वर्षांपासून हा वैद्यकीय व्यवसाय करत असताना आरोग्य विभागाला याची माहिती नसावी का? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहे.

## परळीत खळबळजनक हत्याकांड; खून करून मृतदेह रेल्वे रुळावर टाकला

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या परळी परिसरात पैशांच्या किरकोळ वादातून दारूच्या नशेत ३६ वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. खून केल्यानंतर आरोपींनी मृतदेह लेंडेवाडी परिसरातील रेल्वे रुळावर ठेवून आत्महत्येचा बनाव रचण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोकाट कुत्र्यांनी मृतदेह बाजूला ओढल्यामुळे हा डाव फसला आणि खुनाचा संपूर्ण थरार समोर आला.

सदर प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत प्रकरणाचा छडा लावून ऋषिकेश फड आणि गौरव व्यास या मयताच्या दोन मित्रांना अटक केली आहे. अबजल उर्फ तौहिद खान कैराती खान असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. मयत तौहिद आणि दोन्ही आरोपी हे एकमेकांचे जिवलग मित्र असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



३१ मे रोजी मयतासह तिघे ऋषिकेशच्या कारमधून परळी तालुक्यातील वरवटी शिवारात गेले होते. तेथे त्यांनी दुपारी दारूचे सेवन केले. त्यानंतर रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास पुन्हा एकदा पार्टी केली. या पार्टीदरम्यान पैशांच्या देवाणघेवाणीवरून तिघांमध्ये जोरदार वाद झाला. वाद चिघळत गेल्यानंतर ऋषिकेश आणि गौरव यांनी बाजूला पडलेला मोठा दगड उचलून तौहिदच्या डोक्यात मारला. तौहिद बेशुद्ध पडल्यावरही नशेत असलेल्या आरोपींनी त्याला बेदम मारहाण केली, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर घाबरलेले आरोपी मध्यरात्री सुमारे १.३० वाजेपर्यंत मृतदेहाजवळच थांबले होते. त्यानंतर त्यांनी तौहिदचा मृतदेह कारमध्ये टाकला आणि लेंडेवाडी शिवारातील रेल्वे पटरीवर नेऊन ठेवला. तौहिदने रेल्वेखाली येऊन आत्महत्या केल्याचा भास निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र आरोपी घटनास्थळावरून निघून गेल्यानंतर परिसरातील मोकाट कुत्र्यांनी मृतदेह ओढत रेल्वे रुळांबाहेर आणल्याने त्यांचा प्रयत्न फसला.

१ जून रोजी सकाळी स्थानिक नागरिकांना रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच परळी शहरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे, मोबाईल कॉल रेकॉर्ड्स आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित म्हणून ऋषिकेश फड आणि गौरव व्यास यांना ताब्यात घेतले.

## पोर्टेबल सोनोग्राफी मशीनद्वारे घराघरात गर्भलिंग निदान; पोलिस तपासात मोठे रॅकेट उघड

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील केडगावमध्ये गर्भलिंग निदानाचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. एका बोगस डॉक्टरकडून पोर्टेबल सोनोग्राफी मशीनच्या माध्यमातून घरामध्ये गुप्तपणे गर्भलिंग तपासणी केली जात असल्याची माहिती समोर आली होती. गर्भलिंग तपासणीसाठी संबंधितांकडून ३५ ते ५० हजार रुपये आकारले जात होते. या प्रकरणी बोगस डॉक्टर अण्णासाहेब गिरी याच्याविरोधात यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास केला असता यात अनेकांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गुजर यांनी या प्रकरणी तक्रार दिली होती. याबाबत बोलताना गुजर यांनी म्हटले होते की, गर्भलिंग निदान




करण्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. व्हिडिओच्या आधारे यवत पोलीस स्टेशन एफआयआर दाखल केला होता. या एफआयआरच्या आधारे यवत पोलीस स्टेशनने दोन आरोपींना अटक केली आहे. या अटकेनंतर लक्षात आले की गर्भलिंग निदानाचे जाळे दौंड तालुक्यात पसरलेला आहे. या प्रकरणात सात ते आठ डॉक्टर संबंधित आरोपीच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे.

पुढे बोलताना गुजर यांनी सांगितले की, आमच्याकडे ३० सोनोग्राफी सेंटर रजिस्टर आहेत. सिस्टीमच्या बाहेर राहून हा संबंधित व्यक्ती काळे कारणामे करायचा. त्यामुळे त्याची अधिकृत माहिती आमच्याकडे नाही. संबंधित व्यक्ती एजंटला हाताशी धरून तो डायरेक्ट त्या महिलेच्या घरी जायचा आणि सोनोग्राफी करायचा. तो सिस्टीम मध्ये कुठेच राहिला नाही. तो व्हिडिओ आमच्या हाती आला आणि आम्ही एफआयआर दाखल केली. दौंड आणि दौंड तालुक्यातील नागरिकांना नम्र विनंती आहे या गुन्ह्याच्या संदर्भात आपल्या कडे काही माहिती असल्यास पोलीस स्टेशन किंवा दौंड उपजिल्हा रुग्णालय इथे संपर्क साधून ती माहिती द्यावी.

या प्रकरणावर बोलताना यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले की, मागील काही दिवसांपूर्वी केडगाव येथे गर्भलिंग निदान होत असलेला व्हिडिओ वायरल झाला.

## निदा खानला २-३ दिवसांसाठी रूम दिली; मतीन पटेल यांची एसआयटीसमोर कबुली

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याने एमआयएम नगरसेवक मतीन पटेल सध्या अडचणीत सापडले आहेत. तर निदा खान ही माजी खासदार इम्तियाज जलील यांची नातेवाईक असल्याचा आरोप शिंदे सेनेच्या स्थानिक पदाधिकार्यांनी केला आहे.

याप्रकरणात मतीन पटेल यांची नाशिकच्या एसआयटी पथकाने दोन तीन वेळा चौकशी केली आहे. त्यांची अजून एकदा चौकशी करण्यात आली. त्यांनी निदा खान हिच्याशी कशी भेट झाली, ते तिला कसे ओळख होते याची माहिती दिली. तर त्याचवेळी विरोधकांच्या टीकेलाही त्यांनी प्रत्युत्तर दिले.

मी पोलिसांना म्हणालो की मला इम्तियाज जलील यांना कॉल करू द्या. इम्तियाज जलील यांना काहीही माहिती नव्हती. इम्तियाज जलील हे माझे नेता आहेत, मला काहीही अडचण आली



तर मी जलील यांना फोन करतो. या प्रकरणात इम्तियाज जलील यांचा काहीही संबंध नाही. निदा खान ही इम्तियाज जलील यांचे नातेवाईक नाही, जो कुणी असं सांगतोय तो खोटं बोलत आहे. त्यांचा या प्रकरणाशी काहीच संबंध नाही असा खुलासा नगरसेवक मतीन पटेल यांनी केला आहे.

पालकमंत्र्यांचं इम्तियाज जलील यांच्यावर विशेष प्रेम आहे. त्यामुळेच ते सारखं सारखं त्यांचं नाव घेत असल्याचा चिमटाही मतीन पटेल यांनी काढला. निदा खान ही जेव्हा वास्तव्याला होती, तेव्हा इम्तियाज जलील यांच्याशी बोलणेच झाले नाही. आमच्यात कोणताही फोन झाला नाही. माझ्या फोन मध्ये रेकॉर्डींग्स आहेत. इम्तियाज जलील यांचा याप्रकरणाशी काही संबंध नाही, असा दावा एमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांनी केला आहे. मी काही चुकीचं केलं नाही, त्यामुळे याप्रकरणात कोर्टात लढा देणार असल्याचे मतीन पटेल म्हणाले.

This letter is issued by the **Owner Pooja Vishal Ugale** and the **printer, publisher Achut Dagdu More** Printed at Jagamitra Offset Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna Taluka and District Jalna - 431203 (Maharashtra) And Published at Office Dainik Shubh Prabhat, H.No. 327, Om Shanti Galli, Near Mammadevi Kirana Store, Sambhaji Nagar Jalna, Taluka and District Jalna - 431203 (MAHARASHTRA) Editor **Achut Dagdu More,** Mob. No. 7020871500, **E-mail : dainikshubhprabhat@gmail.com PRGI Registration Number - MHMAR/25/A1228**

**हे पत्र मालक पूजा विशाल उगले आणि मुद्रक, प्रकाशक अच्युत दगडू मोरे यांनी जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजी नगर जालना, तालुका जिल्हा जालना - ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक शुभ प्रभात, घर नं. ३२७, मंम्मादेवी किराणा जवळ, ओम शांती गल्ली, संभाजी नगर, जालना. तालुका आणि जिल्हा जालना-४३१२०३ (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. संपादक : अच्युत दगडू मोरे, मो.नं. ९८५०५१६७२४, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1228, E-mail : dainikshubhprabhat@gmail.com**

# अहिल्यादेवी होळकर जयंती न साजरी करणाऱ्या ग्रामपंचायती व मुख्याध्यापकांवर कारवाईची मागणी

**संतोष तळपे । घनसावंगी**

घनसावंगी तालुक्यातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१ मे रोजी शासनाच्या आदेशानुसार सर्व ग्रामपंचायती, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच शाळांमध्ये साजरी करणे बंधनकारक असतानाही घनसावंगी तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती व जिल्हा परिषद शाळांमध्ये जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला नसल्याचा आरोप सकल धनगर समाजाने केला आहे.

या प्रकारामुळे धनगर समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली असून संबंधित ग्रामसेवक, मुख्याध्यापक व जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही समाजबांधवांनी दिला आहे.

यासंदर्भात सकल धनगर समाजाच्या वतीने गटविकास अधिकारी, तहसीलदार आणि गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात जयंती व महिला सन्मान पुरस्कार कार्यक्रम आयोजित न करणाऱ्या सर्व ग्रामपंचायती, जिल्हा परिषद शाळा तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयांची तात्काळ चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, ग्रामसेवक व इतर जबाबदार व्यक्तींची जबाबदारी निश्चित करून शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याप्रकरणी शिस्तभंग व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची स्वतंत्र चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, जिल्हा परिषद शाळा व इतर शासकीय कार्यालयांच्या जयंती कार्यक्रमाचा आढावा घेऊन त्याचा अहवाल व छायाचित्रे दोन दिवसांत सकल धनगर समाज, घनसावंगी यांना उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.



या निवेदनावर गजानन केशव वाशी, राजू बाबासाहेब पांढरे, दिनेश अंकुशराव पांढरे, मनोहर भारत पांढरे, रघुनाथ पांढरे, कृष्णा पांढरे, योगेश पांढरे, सुग्रीव वायसे, वैजनाथ वायसे, संतोष माने, वसंत वैजनाथ वायसे, रखमाजी पांढरे, सूर्यभान पांढरे, कृष्णा शेळके, सुरेश पोटे, संतोष तळपे यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते

## संपादक संतोष भुतेकर यांच्यावरील हल्ल्याचा परतूर पत्रकारांकडून तीव्र निषेध

**परतूर । प्रतिनिधी**



परतूर येथे दैनिक जगाचा जगमित्रचे संपादक संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ परतूर तालुका पत्रकारांच्या वतीने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

दि. ०२ जून २०२६ रोजी जालना येथे संतोष भुतेकर यांच्यावर काही असामाजिक प्रवृत्तीच्या व्यक्तींनी हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेमुळे पत्रकारांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर आघात झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील विविध प्रश्न जनतेसमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो. अशा परिस्थितीत पत्रकारांवर होणारे हल्ले अत्यंत गंभीर असून लोकशाहीसाठी धोकादायक आहेत.

परतूर तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने या हल्ल्याची सखोल चौकशी करून संबंधित दोषींना तात्काळ अटक करावी व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच भविष्यात पत्रकारांवर अशा प्रकारचे हल्ले होऊ नयेत यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## भारतीय संरक्षण दलात निवड झालेल्या माजी विद्यार्थ्यासह ३२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**परतूर । प्रतिनिधी**

पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, परतूरच्या वतीने श्री श्री रविशंकर ध्यान केंद्र येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात भारतीय संरक्षण दलात निवड झालेल्या प्रशालेचे माजी विद्यार्थी आशिष भिसे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या ३२ गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश राठोड होते. प्रमुख पाहुणे म्हणून भगवानराव मोरे, दया काटे आणि उमाकांत बरिदे उपस्थित होते. दीपप्रज्वलन व आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, कठोर परिश्रम, शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वास याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.



अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक गणेश राठोड यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असून जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर ते राष्ट्रीय स्तरावरही यश मिळवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

दहावीच्या परीक्षेत अजय गोरे याने ९६.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रद्युम्न गोरे याने ९४.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर वैष्णवी अंभुरे हिने ९३.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय इतर गुणवंत विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्रे व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास पालक, शिक्षकवृंद व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास गाडगे व श्रीमती तरोटे यांनी केले.

## आमदार रोहित पवार यांची करंजा गावाला भेट

### जेटी व पुलाच्या कामाची बोटीतून पाहणी, सरकारला धारेवर धरण्याचे आश्वासन!

**तृप्ती भोईर । उरण**

आमदार रोहित दादा पवार यांनी आज करंजा गावाला सदिच्छा भेट देऊन स्थानिक मच्छीमार, शेतकरी आणि ग्रामस्थांच्या विविध जळजळीत समस्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. उरण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. भावनाताई घाणेकर यांनी या महत्त्वपूर्ण दौऱ्याचे आयोजन केले होते.

दौऱ्याची सुरुवात करत आमदार रोहित पवार यांनी करंजा येथील प्रसिद्ध द्रोणागिरी मातेच्या मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी मंदिराला मिळालेल्या पर्यटनाचा दर्जा आणि मंदिर परिसर सुशोभीकरणाच्या कामाबाबत त्यांनी ग्रामस्थांकडून सविस्तर माहिती घेतली. आ. रोहित पवार यांनी नव्याने सुरू असलेल्या करंजा खाडीतील पुलाच्या कामाची बोटीतून जात प्रत्यक्ष पाहणी केली. या पुलाच्या कामामुळे बाधित झालेल्या मच्छीमार आणि शेतकरी वर्गाला मिळणाऱ्या नुकसान भरपाईबाबत त्यांनी चर्चा केली.



पुलाच्या बांधकामामुळे स्थानिक पातळीवर होत असलेल्या अन्यायाबाबत ग्रामस्थांनी त्यांच्याकडे व्यथा मांडल्या. त्यानंतर त्यांनी 'करंजा मच्छीमार सोसायटी'च्या कार्यालयाला भेट देऊन मच्छीमार समाजाच्या समस्या जाणून घेतल्या. या बैठकीत मच्छीमारांनी खालील प्रमुख प्रश्न आमदारांसमोर मांडले: मच्छीमारी नौकांसाठी मिळणारा डिझेल कोटा आणि थकीत डिझेल परताव्याचा प्रश्न, करंजा पोर्ट आणि बंदरात मच्छीमारांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी, मच्छीमार समाजाच्या गावठाण विस्ताराची बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेली मागणी, मासळी खरेदी विक्री दरम्यान व्यापारी वर्गाकडून होणारी मच्छीमाऱ्यांच्या आर्थिक फसवणूक, शासनाकडून मच्छीमारांना नव्याने शेतकरी दर्जा जाहीर झाला आहे, परंतु अद्याप पर्यंत मच्छीमार समाजाला याचा कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळाला नाही.

या सर्व समस्या ऐकल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी मच्छीमार व शेतकरी वर्गाला आश्वासित केले की आगामी पावसाळी अधिवेशनात करंजा पोर्ट पुलाचे काम आणि बाधित मच्छीमारांच्या सर्व प्रश्नांवर आवाज उठून सरकारला धारेवर धरले जाईल आणि हे प्रश्न मार्गी लावले जातील.

या दौऱ्याप्रसंगी सिताराम नाखवा, मार्तंड नाखवा, के एल कोळी, रमेश भगत, भारत नाखवा, रमेश नाखवा, जयेंद्र नाखवा, नरेश कोळी उरण नगरपालिकेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व नगरसेवक तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर, कल्पेश थळी, मधुकर थळी, काँग्रेस नेते भालचंद्र घरत, मनोहर थळी, शैलेश डाऊर, देवदास थळी, मुकेश थळी, परेश म्हात्रे सह ग्रामस्थ व मच्छिमार उपस्थित होते.

## अवैध गौण खनिज प्रकरणाच्या चौकशीचे तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनाने आमरण उपोषणार्थीची माघार

**दिलीप शिंदे । सोयगाव**




अवैध गौणखनिजाच्या एकूण अठरा तक्रारी बाबत कारवाई करण्यात यावी यासाठी बुधवार पासून सुरू असलेल्या सोयगाव तहसील समोरील उपोषण दि.०४ गुरुवारी सायंकाळी चार वाजता तहसीलदार मनिषा मेने-जोगदंड यांच्या लेखी आश्वासनाने माघार घेण्यात आले. संदिप इंगळे आणि दिलीप शिंदे या दोन सामाजीक कार्यकर्त्यांनी तालुक्यातील अवैध गौण खनिजाच्या वाहतुकीची तब्बल १८ तक्रारी महसूल कडे केलेल्या होत्या पंधरा महिन्यांचा कालावधी लोटला परंतु महसूल विभागाने या तक्रारीकडे दुर्लक्ष करून कारवाई केली नव्हती या तक्रारींची एस आय टी चौकशी व्हावी यासाठी संदीप इंगळे, दिलीप शिंदे यांनी बुधवार पासून सोयगाव तहसील समोर आमरण उपोषण सुरू केले होते यावर तोडगा काढण्यासाठी गुरुवारी सायंकाळी चार वाजता नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांनी चौकशी करून कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आमरण उपोषण ची माघार घेण्यात आली आहे दरम्यान यामध्ये प्रमुख तक्रारीत जरंडी येथील चिमणापूर धरणातून एका ठेकेदाराने प्लॉटींग साठी चारशे ब्रास विनापरवाना मुरुमाची वाहतूक केल्या ची तक्रार संदीप इंगळे यांनी (दि. २८) जानेवारी केली होती यावरून संबंधिताच्या मालकीचे गटावर १९६६ च्या कलम १४९ व १५० नुसार बोजा नोंद करण्यात येईल असे लेखी आश्वासन नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांनी दिले त्यामुळे उपोषणाची माघार घेतली आहे. पंधरा दिवसात शासकीय व मालकी हक्कात जास्तीचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासनात नमूद करण्यात आले आहे.

## परतूरमध्ये 'सीबीएससी' नावाखाली दिशाभूल?

### मान्यता नसतानाही जाहिराती, कारवाईची मागणी

**परतूर । प्रतिनिधी**



परतूर शहरात काही इंग्रजी माध्यम शाळांकडून 'सीबीएससी' (CBSE) मान्यता नसतानाही स्वतःला सीबीएससीशी संलग्न असल्याचा दावा करून जाहिरात केली जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत.

या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमुळे पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप होत असून संबंधित शाळांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

शहरातील काही शाळा प्रवेश प्रक्रियेदरम्यान 'सीबीएससी पॅटर्न', 'सीबीएससी बोर्ड' अशा शब्दांचा वापर करून आकर्षक जाहिराती करत आहेत. मात्र प्रत्यक्षात त्या शाळांना केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची अधिकृत मान्यता नसल्याचे उघड होत आहे.

यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

मान्यता नसताना अशा प्रकारची जाहिरात करणे नियमबाह्य असून, संबंधित शाळांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अन्यथा पालकांची दिशाभूल होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पालकांनी प्रवेश घेण्यापूर्वी शाळेची अधिकृत मान्यता तपासून घ्यावी, असे आवाहनही करण्यात येत आहे. तसेच शिक्षण विभागाने या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

## थोडक्यात...

### व्यापाऱ्यावर हल्ला प्रकरणी व्यापारी महासंघाचे निवेदन

**परतूर । प्रतिनिधी**

परतर शहरातील व्यापारी एका ट्रेडर्स पंकज होलानी व प्रवीण होलानी यांच्यावर रेल्वे स्टेशन परिसरात भर बाजारपेठेत झालेल्या भ्याड हल्ल्याचा व्यापारी महासंघ, तर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. परतूर शहरातील एका कापड दुकानाजवळ पंकज होलाणी व प्रवीण होलाणी यांच्यावर दिनांक २ जुन रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास अज्ञात इस्मानी हल्ला केला व जवळील रोख रक्कम पळून नेण्याचा प्रयत्न केला यामध्ये दोन्ही व्यापारी जखमी झाले असून या संदर्भात परतुर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच व्यापारी महासंघाने निवेदन देऊन संरक्षणाची मागणी करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.

### म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांची गेट वे ऑफ इंडियाला भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत दौऱ्यावर आलेल्या म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांनी आज मुंबईतील ऐतिहासिक गेट वे ऑफ इंडियाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत म्यानमारचे शिष्टमंडळ, तसेच ताज हॉटेलचे प्रतिनिधी आणि इतर संबंधित उपस्थित होते. राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांनी गेट वे ऑफ इंडियाची वास्तूरचना, ऐतिहासिक महत्त्व आणि त्यामागील वारसा याबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. भेटी दरम्यान राष्ट्रपतींनी या भव्य स्मारकाची बारकाईने पाहणी केली. गेट वे ऑफ इंडियाची वैशिष्ट्ये, बांधकामातील कलात्मकता; तसेच भारताच्या इतिहासातील स्थान याविषयी त्यांनी विशेष उत्सुकता दाखवली. गेट वे ऑफ इंडियाचा इतिहास आणि वास्तुशिल्पीय वैशिष्ट्ये जाणून घेताना ह्लाईंग यांनी गेट वे ऑफ इंडियाचे कौतुक केले. त्यांनी यावेळी विविध पैलूंची माहिती उत्सुकतेने समजून घेतली.

### महागाई-बेरोजगारीविरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही काळापासून देशातील महागाईत प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे सामान्य जनतेचे कंबरडे मोडलं आहे. एकीकडे महागाई आणि दुसरीकडे बेरोजगारी यामुळे संकट आणखी वाढले आहे. याच प्रश्नांबाबत आज नवी मुंबईत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून आंदोलन करण्यात आले. सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जेव्हा पोलिस आणि आंदोलक आमनेसामने आले त्यावेळी मोठा राडा झाला. राष्ट्रवादीच्या अनेक आंदोलकांना यावेळी पोलिसांनी ताब्यात घेतले. यात रोहिणी खडसे, रोहित पवार, जितेंद्र आव्हाड या नेत्यांचा समावेश आहे.

नवी मुंबईतील या आंदोलनात आंदोलकांनी चूल मांडून आणि भांडी वाजवून आंदोलन केले. सिडको एक्झिबिशन बाहेर पोलिसांचा मोर्चा अडवण्यात आल्यानंतर पोलिस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली. यावेळी शाब्दिक चकमक आणि ढकलाढकली झाली. यावेळी सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार आणि जितेंद्र आव्हाड यांना पोलिसांना ताब्यात घेतलं होतं. रोहिणी खडसे सक्षणा सलगर यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. खडसे यांना पोलिसांनी उचलून नेलं.

या आंदोलनानंतर बोलताना जयंत पाटील यांनी म्हटले की, महाराष्ट्रात आंदोलन करण्याची कुणाला परवानगी राहिलेली नाही. चालू नेत्यांना आंदोलनातून पकडून घेऊन जाणे अतिशय चुकीचं आहे, त्याचा आम्ही निषेध करतो. देशात महागाई प्रचंड वाढली आहे. यामुळे सामाम्य जनता प्रचंड अस्वस्थ झाली आहे. सुप्रिया सुळे यांनी या आंदोलनाबाबत म्हटले की, महागाई, बेरोजगारी आणि प्रचंड होणारा भ्रष्टाचार यामुळे देशाची आर्थिक स्थिती अडचणीत आली आहे. त्यामुळे हे आंदोलन करण्यात आले. आमदार रोहित पवार यांनी या आंदोलनाबाबत म्हटले की, झोपलेल्या सरकारला जाग करण्यासाठी आमचं आंदोलन आहे.

देशात अघोषित आणीबाणी आहे, कोणालाच व्यक्त होता येत नाही. शेतकऱ्यांनी दिलेली कर्जमाफी ही फसवी आहे. कर्जमाफीत अनेक कठोर अटी आहेत. २०१८ च्या कर्जमाफीतही अनेक कठोर अटी होत्या.

# रेवदंडा ग्रामपंचायतीत महायुतीला जबरदस्त धक्का

## शेकाप-महाविकास आघाडीचा जल्लोषात विजय सोहळा

**निलेश फुंडे । रेवदंडा**

रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायतीवर शिंदे गटाची सत्ता असतानाही उपसरपंचपदाच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष व महाविकास आघाडीने राजकीय डावपेच यशस्वी करत महायुतीला जबरदस्त धक्का दिला आहे. शेकाप-महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष सदाशिव मोरे यांनी बहुमताने विजय मिळवत उपसरपंचपद पटकावले. या अनपेक्षित विजयामुळे रेवदंड्यात शेकाप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून गुरुवारी या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष अभूतपूर्व उत्साहात साजरा करण्यात आला. रेवदंडा ग्रामपंचायतीच्या तत्कालीन उपसरपंच मंदा बळी यांचे अतिक्रमित बांधकाम प्रकरणी उपसरपंचपद रद्द करण्यात आले होते. त्याचप्रमाणे दिक्षा बळी यांचे सदस्यत्वही रद्द झाल्याने उपसरपंचपदाची जागा रिक्त झाली होती. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २ जून) झालेल्या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते.

गुप्त मतदान प्रक्रियेत संतोष मोरे यांना तब्बल ९ मते मिळाली, तर महायुतीचे उमेदवार सुराराम माळी यांना पराभवाचा सामना करावा लागला. ग्रामपंचायतीवर सत्ता असूनही महायुतीला आपले सदस्य एकत्र ठेवण्यात अपयश आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या निकालामुळे स्थानिक राजकारणात अनेक तर्कवितर्कांना उधाण आले असून काही सदस्यांच्या क्रॉस व्होटिंगची चर्चा देखील दबक्या आवाजात सुरू आहे.

या विजयाचा जल्लोष गुरुवारी दुपारी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. रेवदंडा पारनाका येथून संतोष मोरे यांच्या निवासस्थानापर्यंत भव्य विजय मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत फटाक्यांची आतषबाजी, बेंजोच्या तालावर ठेका आणि कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण रेवदंडा परिसर दुमदुमून गेला.

सुरुवातीला पारनाका येथील श्री हनुमान मंदिरात दर्शन घेऊन विजय मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो, महाविकास आघाडीचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. महिला, युवक, ज्येष्ठ कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेकांनी मोबाईलमध्ये या ऐतिहासिक क्षणांचे छायाचित्रण केले, तर तरुणांनी सेल्फी घेत विजयाचा आनंद साजरा केला.



मान्यवरांची उपस्थिती

या विजय सोहळ्यास रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक यांच्यासह शेकाप व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, महिला आणि तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रेवदंडा ग्रामपंचायतीवर महायुतीची सत्ता असतानाही शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवाराला बहुमत मिळाल्याने हा विजय केवळ उपसरपंचपदापुरता मर्यादित नसून स्थानिक राजकारणातील बदलत्या समीकरणांचा संकेत मानला जात आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निकालाने महायुतीसमोर आत्मपरीक्षणाचे आव्हान उभे केले असून शेकाप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र रेवदंड्यात पाहायला मिळत आहे.